# मेट्रो ३ : तापी टीबीएमच्या मदतीने १६ वे भुयार खणण्यात यश

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्णतः भुयारी मेट्रो ३ मार्गिकेचे १५ वे भुयार खणून अवघे काही दिवस उलटले असून तापी टीबीएमच्या मदतीने १६ वे भुयार खणण्यात यश आले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोड दरम्यानच्या ६८७ मीटर अंतराचे भुयार तापी टीबीएमने पूर्ण केले असून ३२ भुयारांपैकी १६ भुयारांचे काम पूर्ण झाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ ते सहार रोड मेट्रो स्थानक या पॅकेज ६ अंतर्गत अप आणि डाऊन अशी दोन्ही भुयारे पूर्ण करण्यात आली आहेत. टर्मिनल २ येथील २२ एप्रिल २०२१ रोजी तापी १ या टनेल बोअरिंग मशीनच्या सहाय्याने भुयारीकरणाला सुरुवात केली होती. याला तब्बल १०५ दिवसांचा कालावधी लागला आहे. हा भुयारी टप्पा जमिनीपासून २५ मीटर खोलवर असून ६८७ मीटर भुयारीकरणासाठी ४८८ सेगमेंट रिंग्जचा वापर करण्यात आला आहे. एकूण ३३ किमीच्या या भुयारी मार्गिकेदरम्यान दक्षिण मुंबई ते पश्चिम उपनगर जोडण्यात येणार असून २७ थांबे असणार आहेत. भुयारीकरणासाठी भूगर्भात सध्या १७ टीबीएम कार्यरत आहेत.